# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**लातूर जिल्हयातील भंडारवाडी प्रकल्पाच्या गेटची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१) ८८८११ (१२-०८-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील भंडारवाडी मध्यम प्रकल्पातील गेट नादुरुस्त असल्याने या प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत असल्याने सदर गळती थांबविण्यासाठी या प्रकल्पाच्या नादुरुस्त गेटची विशेष दुरुस्ती करण्याची मागणी लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कार्यकारी अभियंता,लातूर पाटबंधारे विभाग,लातूर क्र.२ यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाच्या नादुरुस्त गेटची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) सरपंच,पानगांव ता.रेणापूर यांनी दिनांक २९.११.२०१६ रोजी कार्यकारी अभियंता, लातूर लघु पाटबंधारे विभाग, लातूर यांच्याकडे मागणी केलेल्या पत्राची प्रत कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र २, लातूर यांचे कार्यालयास प्राप्त आहे.

(२) नोव्हेंबर २०१६ मध्ये निदर्शनास आलेली गळती कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र.२, लातूर या विभागाकडून यांत्रिकी विभागाच्या सहकार्याने रेती, कच, काळी माती व बारदाना (सुतळी) वापरुन तात्पुरती बंद करण्यात आली आहे. सदर गळती कायमस्वरुपी बंद करणेच्या दृष्टीने पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.पो.देवंग्रा (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे गाव तिथे रस्ता या योजनेंतर्गत रस्त्याला मंजूरी मिळण्याबाबत**

**(२) ९१९४१ (१२-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.देवंग्रा (ता.भूम, जि.उस्मानाबाद) हे सुमारे २ हजार लोकसंख्येचे गाव असून मुख्य रस्त्यापासून ४ किमी अंतरावर असून गावाला जाण्यासाठी अद्यापपर्यंत पक्का रस्ता नसल्याने मु.पो.देवंग्रा येथे गाव तिथे रस्ता या योजनेंतर्गत रस्ता मंजूर करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक २८ जून,२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि. २७ जून, २०१७ रोजी पत्र दिले आहे.

(२) देवंग्रा ते प्रजिमा १० हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. ०५ वरील ६०० मीटर सुटलेली लांबी आहे.

सद्यस्थितीत सदर रस्त्याच्या सावरगाव ते देवांग्रा या गावाच्या शिवेवरुन गेलेल्या भागाचे अतिक्रमण दूर करुन रस्ता मोकळा करण्याची कार्यवाही तहसिलदार, भुम यांच्यामार्फत सुरु आहे.

अतिक्रमण दूर करण्याची कार्यवाही पुर्ण होताच निधीच्या उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे काम प्राधान्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील सिंचनाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या पेंच प्रकल्पातील पाण्याच्या समस्येसंदर्भात निर्णय घेण्याबाबत**

**(३) ९५८५६ (०६-०१-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सिंचनाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या पेंच प्रकल्पातील पाण्याच्या समस्येसंदर्भात दिनांक ०१ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयामध्ये झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी निर्देश दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) होय.

(२) मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.१.९.२०१७ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत खालील निर्देश दिले आहेत.

पेंच प्रकल्पात सध्या निर्माण झालेली परिस्थिती ही दुष्काळी स्वरूपाची असून जलसंपदा विभागाने प्रस्तावित केलेल्या तातडीच्या व कायमस्वरूपी उपाय योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करून मदत व पुनर्वसन विभागामार्फत दुष्काळ निवारण योजनेंतर्गत (Drought Mitigation measures) या सदराखाली प्रस्तावित करुन त्यांना युद्ध पातळीवर दोन महिन्यात मंजूरी द्यावी.

डिसेंबर २०१७ च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात या योजनांना लागणा-या निधीची मागणी पुरवणी मागणीद्वारे सादर करावी.

कालव्याद्वारे सिंचनाचे पाणी कमी उपलब्ध होणार असल्याने लाभक्षेत्रात विहिरी व विंधन विहिरी /सुक्ष्म सिंचन/ठिबक सिंचन राबविण्यात यावे.

(३) दि. २३/०२/२०१८ रोजी मा. पालकमंत्री, नागपूर यांचे समवेत झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार रु. १०१५ कोटी किंमतीचा सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त झाला. त्यास दि. २२/०३/२०१८ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता प्राप्त झाली असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील भावली (इगतपूरी) धरणाची रुंदी वाढविण्याबाबत**

**(४) ९५८९३ (०२-०१-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील भावली(इगतपूरी) धरणावरील पाणीपुरवठ्याचा ताण सशक्त करण्यासाठी धरणाची उंची, खोली आणि रुंदी वाढविण्यास मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजुरीनुसार धरणाची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) नाही.

मा. मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०८/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी भावली धरणातील पाण्याच्या आरक्षणाच्या मुद्याबाबत "भावली धरण हे नांदूर मधमेश्वर प्रकल्पाचा भाग असून व नांदूर मधमेश्वर प्रकल्पाचे पाणी मुख्यत्वे वैजापुर व गंगापूर (औरंगाबाद) या अवर्षण प्रवण तालुक्यातील सिंचनासाठी असल्यामुळे समन्यायी तत्वानुसार बिगर सिंचनासाठीच्या वाढत्या मागणीचा विचार करून भावली धरणाची उंची वाढविता येईल का? याबाबत तातडीने सर्वेक्षण करण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

(२) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या उपरोक्त निर्देशानुसार क्षेत्रिय स्तरावर प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हातपंप मदतनीस यांचे वेतन कपाती पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(५) ९५९८४ (०३-०१-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातपंप मदतनीस यांच्या बंद केलेल्या वेतन कपाती पुर्वव्रत सुरु करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी नाशिक जिल्हा परिषदेस दिले असून देखील सदर वेतन कपाती पुर्ववत सुरु करण्यात आले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वेतन कपाती पुर्वव्रत सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्या सुमारास मा. ग्रामविकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वेतन कपाती पुर्वव्रत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही, प्रस्तुत कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली असल्याने २००७-०८ व २००८-०९ च्या लेखा परिक्षणात त्यांच्या वेतन कपाती संदर्भात आक्षेप नोंदविण्यात आल्याने वेतन कपाती बंद करण्यात आल्या होत्या. तथापि,मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचे आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि),मुख्य लेखा व वित्त अधिकारी,कार्यकारी अभियंता(ग्रापापु) व उप अभियंता(यांत्रिकी)यांचे दि.९.३.२०१७ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत न्यायालयाचा अवमान होवु नये म्हणून कपाती सुरु करणेबाबत निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार तालुका स्तरावरील सर्व गटविकास अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

(२) या संदर्भात मा.राज्यमंत्री ग्राम विकास यांचेकडे निवेदन देण्यात आले आहे.

(३) कपाती पुर्ववत सुरु करणे बाबत संबंधीत तालुकास्तरावर गट विकास अधिकारी,पंचायत समिती, यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडहिंग्लज व चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये पावसाळ्यामध्ये हिरण्यकेशी नदीतून वाहून जाणारे अतिरिक्त पाणी कर्नाटक धर्तीवर लघु पाटबंधारे तलावात साठविण्याबाबत**

**(६) ९६७११ (२६-१२-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड व गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ७ लघुपाटबंधारे तलावातील पाण्याचा साठा शेती व पिण्यासाठी कमी पडत असल्याने कर्नाटक सरकारने हिरण्यकेशी नदीवर शंकरलिंग मठाजवळ सुमारे २०० ते २५० अश्वशक्तीचे पंप बसवून आजुबाजूच्या सुमारे १० किलोमीटर परिसरातील लघुपाटबंधारे तलाव व पाझर तलावामध्ये हिरण्यकेशी नदीतून वाहून जाणारे अतिरिक्त पाणी उपसा करुन घेण्याची योजना राबविली आहे त्याच धर्तीवर लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल तथा पालकमंत्री व मा. जलसंधारण मंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने दोन तालुक्यातील लघुपाटबंधारे तलाव भरुन घेण्याची योजना राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) होय.
(२) पाणी उपलब्धतेबाबत दृढीकरण करून घेवून याबाबतचा अहवाल तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून करण्यात येत असलेल्या विविध योजनांतील अपूर्ण कामांबाबत**

**(७) ९६८२८ (२२-१२-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून करण्यात येत असलेल्या विविध योजनांतील एकूण २५८ कामांपैकी २४० कामे अजूनही अपूर्ण असल्याचे माहे सप्टेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच आर्थिक वर्षाच्या विकासकामांचे नियोजनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करण्यासह आर्थिक वर्षाच्या विकासकामांचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) अंशत खरे आहे.
सद्यस्थितीत एकूण २५१ कामांपैकी १४३ कामे पूर्ण असून ०६ कामे रद्द करण्यात आली आहेत. उर्वरीत १०२ कामे प्रगतीत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) जिल्हा परिषद बांधकाम विभागाअंतर्गत कामे अपूर्ण असल्याने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियता यांनी उपअभियंतांसह बैठका घेवून अपूर्ण कामे मार्च, २०१८ अखेर पूर्ण करण्याबाबतचे तसेच आर्थिक वर्षाच्या विकासकामांचे नियोजन पूर्ण केले आहे.
(४) बांधकाम साहित्यापैकी वाळू घाटाचा लिलाव झाला नसल्याने काही कामे पूर्ण करण्यास विलंब होत आहे.

---

**भिवंडी पंचायत (जि. ठाणे) समितीअंतर्गत समुपदेशनाद्वारे झालेल्या बदल्यांमध्ये झालेला गैरकारभार**

**(८) ९८६७३ (२२-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी पंचायत (जि. ठाणे) समितीअंतर्गत समुपदेशनाद्वारे झालेल्या बदल्यांमध्ये गैरप्रकार झाल्याप्रकरणी भिवंडी पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी यांची चौकशी करण्याची मागणी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास,चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषद, ठाणे मार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून भिवंडी पंचायत समिती अंतर्गत समुपदेशनाद्वारे झालेल्या बदल्यामध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी संबंधित जबाबदार तत्कालीन गट विकास अधिकारी, व विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, भिवंडी यांना दिनांक १७.२.२०१८ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्यांचेविरुध्द नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भामा आसखेड प्रकल्पाच्या (ता.खेड, जि.पुणे) मंजूर प्रकल्प अहवालानुसार प्रस्तावित डावा व उजवा कालवा रद्द करण्याबाबत**

**(९) ९९२७७ (२६-१२-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामा आसखेड प्रकल्पाच्या (ता.खेड,जि.पुणे) मंजूर प्रकल्प अहवालानुसार धरणास डावा व उजवा कालवा प्रस्तावित होता परंतु प्रकल्पाचे मंजूर १८८.६११ दलघमी पाणी वापरापैकी १४१.४८६ दलघमी पाणी पिण्याच्या वापरासाठी आरक्षित झाल्याने प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात कपात होत असल्याने प्रकल्पांतर्गत डावा व उजवा कालवा रद्द करण्याचा प्रस्ताव महामंडळाकडून दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने डावा व उजवा कालवा रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) होय.
(२) शासन पत्र दिनांक ७/१२/२०१६ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार भामा आसखेड प्रकल्पाचे डावा व उजवा कालवा रद्द करणेचा ठराव नियामक मंडळाच्या दिनांक १९/६/२०१७ रोजी झालेल्या ९५ व्या बैठकीत पारित करण्यात आलेला असून नियामक मंडळाच्या दिनांक ३१/१/२०१८ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीत कायम करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर तसेच महानगरपालिकांकडून पुर्नस्थापना निधी प्रतिपूर्तीबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील तिघ्रा ते भानगुरा रस्ताची झालेली दुरवस्था**

**(१०) ९९४३२ (०६-०१-२०१८). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे तिघ्रा ते भानगुरा रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोयी होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी १.५० कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ३५ लक्ष रु, च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता , जि. प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली असून तिघ्रा ते भानगुरा हा रस्ता देवधाबा तिघ्रा भानगुरा रणथम दुधलगांव वाघोळा म्हैसवाडी नरवेल हरसोडा या इतर जिल्हा मार्ग क्र. २२ चा भागरस्ता आहे. या भागरस्त्याची एकूण लांबी २.४० कि.मी. असून पृष्ठभाग डांबरी आहे. त्यापैकी १.३०० कि.मी. रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर वाहतूक सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## करमाळा, मोहोळ (जि.सोलापूर) तालुक्यांसाठी इतर विकास कामांना मंजूर असलेला निधी मंजूर नसलेल्या कामांसाठी वापरल्याबाबत

**(११) ९९८२७ (२६-१२-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा, मोहोळ तालुक्यांसाठी इतर विकास कामांना मंजूर असलेला निधी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, बांधकाम समितीचे सभापती यांनी परस्पर मंजूर नसलेल्या कामांसाठी वळती केल्याची तक्रार जिल्हा परिषदेचे विरोधी पक्षनेते यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत निधी इतर कामांकडे वळविण्याबाबत निर्णय न घेता परस्पर जिल्हापरिषदेचे अध्यक्ष व बांधकाम समितीचे सभापती यांनी निधी वळविण्याच्या घेतलेल्या निर्णयाच्या विरोधातील तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे तसेच करमाळा तालुक्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनीही याप्रकरणी मा.ग्रामविकास मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

सोलापूर यांच्याकडे दिनांक ०६ ऑक्टोबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

करमाळा, मोहोळ व अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत कामात बदल करण्याच्या प्रस्तावास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. १७.७.२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली असून जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांनी सदर काम बदलास दि. ८.१२.२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डोंगराळ व दुर्गम भागातील रस्त्यांचे बांधकाम करण्याबाबत

**(१२) १०००४६ (२६-१२-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजूरा विधानसभा क्षेत्रांतर्गत डोंगरी दुर्गम भाग येत असून सदर ३० ते ४० गांवे डोंगराळ व दुर्गम भागत असून सदर भागात आदिवासी विभागांतर्गत रस्त्यांनी जोडण्यात आलेले नसल्याचे लोकप्रतिनिधींनी सन २०१५-१६ च्या पुरवणी मागण्यादरम्यान सदर बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणी करुनही अद्यापपर्यंत राजूरा क्षेत्रातील डोंगराळ व दुर्गम भाग रस्त्यांनी जोडले गेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त डोंगराळ व दुर्गम भागातील रस्त्यांचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर रस्त्यांची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्नांकित १८२ गावांपैकी १८१ गावे रस्त्यांनी जोडलेली आहेत. उर्वरीत खडकी रायपूर हे गाव अतिदूर्गम, डोंगराळ व वनक्षेत्रामध्ये येत असल्याने रस्त्याने जोडणे शक्य झाले नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील भोगावती नदीवरील कुडित्रे, बहिरेश्वर-कोगे व आमजाई व्हरवडे-शिरगाव दरम्यानच्या बंधाऱ्यांची झालेली दुरवस्था**

**(१३) १००२३५ (२६-१२-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील भोगावती नदीवर कुडित्रे, बहिरेश्वर-कोगे दरम्यान कोल्हापूरी पध्दतीचे दोन्ही बंधारे पाटबंधारे खात्याने धोकादायक ठरविल्याने या बंधाऱ्यावरुन २० गावांची मुख्यत: कुंभी-कासारी, दत्त आसुर्ले, डी.वाय.पाटील या तीन कारखान्यांची ३ लाख मे. टनाची वाहतुकीसाठी अतिवापर व देखभालीची व्यवस्थाही नाही तसेच वाहतूकीबरोबर पाणी साठवण होत नाही, हे खरे आहे काय

(२) तसेच आमजाई व्हरवडे-शिरगाव दरम्यान सन १९५५ साली बांधलेल्या बंधाऱ्याची दुरवस्था होवून अनेक ठिकाणी पिलरचे व दरवाजाचे दगड निखळल्याने तसेच ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने बंधाऱ्यावरुन धोकादायक स्थितीत वाहतूक सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

भोगावती नदीवरील कुडित्रे, बहिरेश्वर बोगे दरम्यान कोगे बहिरेश्वर हा बंधारा जलसंपदा विभागाचा असून खडककोगे हा बंधारा खाजगी संस्थेचा आहे.

सदर दोन्ही बंधाऱ्यात आवश्यकतेनुसार पाणीसाठा करण्यात आलेला आहे. सदर बंधाऱ्याच्या पाणी साठवण क्षमतेवर कोणताही परिणाम झालेला नाही.

(२) अंशत: खरे आहे.

शिरगांव बंधा-याच्या प्रस्तंभ व स्लॅब यांची काही प्रमाणात पडझड झालेली आहे.

(३) क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली असून आवश्यक दुरुस्ती प्रस्तावित आहे. कोगे बहिरेश्वर या को. प. बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात आलेले असून निविदा निश्चितीची कार्यवाही प्रगती पथावर आहे. शिरगांव बंधा-याच्या अत्यावश्यक दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून किरकोळ दुरुस्तीचे काम प्रगती पथावर आहे. को.प.बंधारा खडक कोगे या खाजगी बंधाऱ्याची देखभाल दुरुस्ती संबंधित पाणी वापर संस्थेकडून करण्यात येते. बंधाऱ्यावरुन सार्वजनिक वाहतूक न करणेबाबत सूचना व इशारा फलक लावणेत आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील मुळा-मुठा नदीवरील राहू-पिंपळगाव दरम्यानच्या कोल्हापूरी बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१४) १००४५६ (२६-१२-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मुळा-मुठा नदीवरील राहू-पिंपळगाव दरम्यानच्या कोल्हापूरी बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याची बाब माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले तदनुसार सदर बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय.

सन २०१५ च्या पावसाळ्यात पूराच्या पाण्यामूळे राहू को.प.बंधा-याच्या खालील बाजूकडील दोन्ही बाजूच्या संरक्षक भिंती पडलेल्या आहेत व बंधा-याच्या स्लॅबला काही ठिकाणी तडे गेले आहेत.तथापि बंधारा सुस्थितीत असून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होत आहे.

राहू को.प. बंधा-याच्या विशेष दुरूस्तीचे रु.१.२० कोटी किंमतीचे अंदाजपत्रक शासनास ऑगस्ट २०१७ मध्ये प्राप्त झाले होते.तथापि विशेष दुरुस्ती/विस्तार व सुधारणा अंतर्गत मा.राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार २ % प्रमाणे प्राप्त निधीच्या मर्यादेत निर्माण झालेले दायित्व विचारात घेता सदर कामास प्राधान्यक्रमानुसार उपलब्ध निधीच्या मर्यादेत मंजूरीचा निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा पंचायत समिती मधील भंडारा जिल्हा परिषदेच्या जागेवर विनापरवाना व्यवसायीक गाळयांचे बांधकाम केल्याबाबत

**(१५) १०१२९४ (२६-१२-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा पंचायत समिती मधील भंडारा जिल्हा परिषदेच्या जागेवर शासनाची किवा जिल्हा परिषदेची परवानगी न घेता, विहीत कार्यपद्धतीचा वापर न करता व्यवसायीक गाळयाचे परस्पर बांधकाम करून सन २०१२ ते २०१५ ह्या कालावधीत गैरव्यवहार केल्याबाबत तत्कालीन गटविकास अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासाठीचा मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा यांनी शासनास पाठविलेला प्रस्ताव शासनाकडे २ -३ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपहार केल्याबाबतची कारवाई प्रलंबित असतांना सदर अधिकाऱ्याला कारवाई व नस्ती हाताळण्या-या सामान्य प्रशासन विभागाच्या प्रमुख पदी सदरचे पद निवड श्रेणीचे असतांना व सदर अधिकारी निवड श्रेणीचा नसतांना नियुक्ती दिली गेलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गैरव्यवहार केलेल्या अधिकाऱ्याला नियमबाह्य महत्वाच्या पदावर नेमणूक देण्यात आल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांच्याकडून दिनांक २७.३.२०१७ च्या पत्रान्वये विभागीय चौकशी सरु करण्याचा प्रस्ताव विभागाकडे प्राप्त झालेला असून तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भंडारा, जिल्हा परिषद, भंडारा यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ मधील नियम-१० खाली दिनांक २३.१.२०१८ च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजाविण्यात आलेले आहेत.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

श्रीमती. एम.आर.भेदे (ठवकर) या सन २०१७ च्या सर्वसाधारण बदलीमध्ये बदलीपात्र असल्यामुळे सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार आणि या विभागाच्या दिनांक ६.८.२०१६ च्या शासन निर्णयातील क्र.५ येथील निर्णयानुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने त्यांची बदली उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र), जिल्हा परिषद भंडारा या पदावर करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर बदली, ही नियमानुसार करण्यात आलेली असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे विलवडे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील नारळ बाग ते भंडारवाडी ग्रामीण रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१६) १०२२५६ (०४-०१-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विलवडे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील नारळ बाग ते भंडारवाडी ग्रामीण रस्त्याची दुरवस्था झाल्याने सदर रस्त्यावरुन दुचाकी वा चारचाकी वाहन ये-जा करण्यास धोकादायक असून ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर रस्त्याबाबत सन २०१५-१६ मध्ये शासनाने निधी मंजूर करुन देखीलसुध्दा अदयापर्यंत रस्त्याचे काम पूर्ण केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१५-१६ मध्ये सदर कामासाठी निधी मंजूर करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्नांकित विलवडे गुरववाडी रेल्वेस्टेशन ग्रामीण मार्ग क्र. १९० या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम जिल्हा परिषद रत्नागिरी मार्फत डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत मंजूरीसाठी जिल्हा नियोजन विभागाकडे पाठविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे दारफळ (सि.) (ता.माढा, जि.सोलापूर) येथील पुलाची झालेली दुरवस्था**

**(१७) १०२५०४ (०२-०१-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे दारफळ (ता.माढा,जि.सोलापूर) येथील सिना नदीवर को.प.बंधारा असून बंधा-यावरील पुलाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने स्थानिक नागरिकांनी गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोल्हापुरी बंधा-यावरील पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
माहे ऑक्टोंबर २०१७ मध्ये सीना कोळेगांव धरणातून सीना नदीत पूर नियंत्रणासाठी सोडण्यात आलेला विसर्ग व स्थानिक ओढे, नाल्यातून आलेल्या पावसाच्या पाण्यामुळे सीना नदीवरील दारफळ को.प.बंधा-याचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे
(२) माहे ऑक्टो २०१७ मध्ये सीना नदीला आलेला पूर ओसरल्यानंतर संबधित क्षेत्रिय अभियंता यांनी को.प.बंधा-याची पाहणी केली आहे. को.प.बंधा-यावरील रेलिंग तुटलेल्या, वाहुन गेलेले होते. तसेच को.प.बंधा-याचे स्लॅबवरील वेअरिंग कोट आणि बंधा-याच्या उजव्या बाजुचे भरावा काही प्रमाणात वाहुन गेल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) को.प.बंधा-याचे नुकसान झालेल्या कामांची दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सक्षम स्तरावर मान्यता घेऊन दुरूस्तीचे कामे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत व श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील कालव्याची दुरुस्ती व अस्तरीकरण कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देवून निधी देण्याबाबत**

**(१८) १०२६७० (०२-०१-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी प्रकल्पातील कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील डाव्या कालव्याचे ३८ कि.मी. लांबीचे तसेच श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील कालव्याची २३ कि.मी. लांबीचे अस्तरिकरण व दुरुस्ती तसेच करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील मुख्य कालव्याचे १२ कि.मी. आणि पोंधवडी शाखा कालव्याचे १२ कि.मी. अस्तरीकरण व पोंधवडी चारी खोदकाम भूभाडे व भूसंपादनाचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळावी अशी करमाळ्याच्या लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री व मा.राज्यमंत्री यांचेकडे दिनांक १० ऑगस्ट,२०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार कालव्यातील दुरुस्ती व अस्तरीकरण कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) होय.

(२) कुकडी प्रकल्पाचा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव कालव्याची दुरुस्ती व अस्तरीकरणासह सन २०१६-१७ च्या प्रचलित दरसूचीनुसार अद्ययावत करुन राज्य तांत्रिक सल्लागार समिती-२ पुणे यांच्या मान्यतेने महामंडळाने दिनांक ३/१/२०१८ रोजी शासनाकडे सादर केला होता.

या प्रकल्पासंदर्भात मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या दालनात दिनांक ३०/१/२०१८ रोजी झालेल्या आढावा बैठकीतील चर्चेनुसार तृतीय सुधारित मान्यतेचा प्रस्ताव शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उचित कार्यवाही करुन फेर प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना शासनाच्या दिनांक १/२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेर्ले दुकानवाडी ते पानोसेवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील कच्च्या रस्त्याचे रुपांतर पक्या रस्त्यामध्ये करण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(१९) १०३००४ (०६-०१-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेर्ले दुकानवाडी ते पानोसेवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील कच्च्या रस्त्याचे रुपांतर पक्या रस्त्यामध्ये करण्यासाठी मंजूरी देवून निधी उपलब्ध करण्यासाठी स्थानिक

ग्रामस्थांनी मा.ग्रामविकास मंत्री, मा.पालकमंत्री सिंधुदूर्ग, तहसिलदार सावंतवाडी, सरपंच ग्रामसचिवालय शेर्ला, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग यांना माहे सप्टेंबर, २०१७ रोजी वा दरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शेर्ले दुकानवाडी ते पानोसेवाडी येथील कच्च्या रस्त्याचे पक्या रस्त्यामध्ये रुपांतर करण्यासाठी मंजूरी देवून निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) अंशत, हे खरे आहे.
स्थानिक ग्रामस्थांनी सरपंच,ग्रा.प.शेर्ला यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ रोजी निवेदन दिले आहे.
(२) प्रश्नांकित शेर्ले पानोसेवाडी या ग्रामीण मार्ग क्र. ३८६ या रस्त्याच्या आराखड्यानुसार एकूण लांबी १.५०० कि.मी. आहे. सद्यस्थितीत सदर ठिकाणी रस्ता अस्तित्वात नसून दुकानवाडी ते पानोसेवाडी अशी शेतामधून जाणारी पायवाट आहे.
सदर रस्त्यासाठी लागणारी जमीन खाजगी मालकीची असून संबंधीत जमीनधारकांकडून उपलब्ध होणे आवश्यक आहे. जमीन उपलब्ध झाल्यास योग्य त्या योजनेमध्ये जिल्हा परिषदेस सदर रस्ता करणे शक्य आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जनाई योजनेत समाविष्ट असलेले तलाव व जोडकालव्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२०) १०३७९४ (०३-०१-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील १८ तलावांचा समावेश असून त्यापैकी उर्वरित कुसेगाव येथील विजयवाडी तलाव, वाघदरा, पडवी येथील गायकवाडमळा, देऊळगावगाडा येथील (३५ आणि ३६ नंबर) आणि खोर असे ६ तलावांना जोडणाऱ्या जोड कालव्यांची कामे मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित आहेत तसेच खोर (ता.दौंड,जि.पुणे) येथील पिंपळदरा, मोरदुती तलाव, देऊळगावगाडा येथील माने वस्ती, वासुंदे येथील बारावकर तलाव, लौंढे तलाव, जाम्बलेवस्ती जिरेगाव येथील लाळगे वाडी, गडदरे तलाव, फोरेस्ट तलाव, जिरेगाव मोठा तलाव हिंगणी गाडा येथील महादेव तलाव पडवी येथील वडाचा डोंगर तलाव पांढरेवाडी येथील गावठाण तलाव, रोटी गावठाण तलाव तसेच लिमटिके तलाव व मळद येथील गावठाण तलाव अशा १४ तलावांचा समावेश या योजनेमध्ये करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ व २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेत समाविष्ट असलेले तलाव व जोडकालव्यांची कामे अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याने या गावांत पाणी पोहोचू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार तलाव व जोडकालव्यांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०६-२०१८) :** (१) व (२) पुणे जिल्हयातील दौंड व बारामती तालुक्यातील अवर्षण प्रवण परिस्थिती विचारात घेऊन, तत्कालीन विधानसभा सदस्य, दौंड यांनी त्यांचे जानेवारी,१९९४ मधील पत्रान्वये दौंड व बारामती तालुक्यातील तलाव जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेद्वारे पावसाळयातील अतिरिक्त पाण्याद्वारे भरुन देण्यात यावे व त्यांचा समावेश या योजनेत करण्याबाबत शासनास विनंती केली.

त्याअनुषंगाने शासनाच्या दि.१२/०९/ १९९४ च्या पत्रान्वये जनाई उपसा सिंचन योजनेद्वारे दौंड तालुक्यातील १८ पाझर तलाव भरुन देण्यास तत्वत: मान्यता दिली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने जनाई उपसा सिंचन योजनेद्वारे १८ पाझर तलाव भरुन देण्याची तरतूद जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या प्रथम सुधारित प्रशासकीय अहवालामध्ये करण्यात आली होती.

महामंडळाच्या दि.१७/०२/२००० च्या निर्णयान्वये जनाई उपसा सिंचन योजनेचा वार्षिक पाणी वापर २.१७ अ.घ.फू. असून त्याद्वारे ८३५० हे. सिंचन क्षेत्र निर्मित करण्याचे प्रस्तावित आहे. जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या मान्यता प्राप्त तृतीय सुधारित प्रशासकीय अहवालानुसार प्रति भरण कालव्याचा खर्च रु.१८ लक्ष आहे.

तथापि स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१६ व २४ मार्च, २०१७ रोजीची पत्रे शासनास व महामंडळास प्राप्त झालेली नाहीत.

(३) दौंड, जि. पुणे मतदारसंघातील जलसंपदा विभागाशी संबंधित कामाबाबत दि.१३/११/१७ रोजी मा. मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदरहू बैठकीमध्ये मा. आमदार श्री. राहूल कुल यांनी जनाई उपसा सिंचन योजनेतील गायकवाड मळा (नडवी), लाळगेवाडी येथील तीन तलाव, जगताप वस्ती (वासुंदे), विजयवाडी (कुसेगाव) व डोंबेवाडी येथील तलावांचे भरण कालव्यांची कामे पूर्ण करावीत अशी मागणी केली होती. सदर तलाव भरुन देण्याच्या दृष्टीने प्रकल्प अहवालातील तरतूद, भरण कालव्यांसाठी येणारा खर्च व शिल्लक तरतूद विचारात घेऊन प्रस्ताव सादर करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ग्रामीण रस्ते सुधारणा कार्यक्रमांतून हाती घेण्याच्या कामाबाबतच्या शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सुचनामध्ये बदल करण्याबाबत

**(२१) १०५४८९ (०७-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ३०५४/५०५४ ग्रामीण रस्ते सुधारणा कार्यक्रमांतून हाती घ्यायच्या कामाबाबतच्या दिनांक ०३ सप्टेंबर,२०१६ रोजी शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सुचनामध्ये बदल करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खराब रस्त्यांचा सर्वेक्षण दर २ वर्षानी करण्यात येणार असल्याने आपत्तीच्या वेळी खराब झालेले रस्त्याचे काम करता न येणे, देण्यात आलेल्या अनुदानातून केवल २ ते ३ कामे मंजूर होणार असल्याने विकास कामांचा समतोल राखला जाणार नाही यामध्ये सुधारणा करून लोकप्रतिनिधीने सुचवलेल्या कामांचा समावेश या योजनेत करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) भारतीय संविधानाच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा रस्ते हे जिल्हा परिषदेकडे राज्य शासनाने वर्ग केलेली योजना (Transfer Scheme) म्हणून दिलेली आहे.

ग्रामीण रस्त्यांसाठी उपलब्ध होणारा मर्यादित निधी विचारात घेता या निधीचा सुयोग्य वापर व्हावा, कामांमध्ये सुसूत्रता राहावी, रस्त्यांचा विकास समन्यायी पध्दतीने व्हावा यासाठी शासनाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामुळे या मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल करणे योग्य होणार नाही.

तथापि, जिल्हा नियोजन समितीने सुचविलेल्या कामांचा समावेश जिल्हा परिषदेच्या पूर्वपरवानगीने करण्याची तरतूद शासन निर्णयामध्ये समाविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील रस्त्यांची दर्जोन्नती करुन ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याबाबत

**(२२) १०५९६२ (०६-०४-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे आरे बाजीप्रभू रोड ते वाकी पिंपळवट-पाटपन्हाळे रस्ता ग्रामा १२ (ता.गुहागर), मौजे पिंपर-पोमेंडी-गोणवली रस्ता ग्रामा. ९८ (ता.गुहागर), मौजे तळवली भडकंबा-वडद साया भोईवाडी ग्रामा.२२ (ता.गुहागर) आणि मौजे खरवते प्राथमिक आरोग्य केंद्र ते ओमळी-ताम्हनमळा-गुळवणे रस्ता प्रजिमा ४९ (ता.चिपळूण) हे रस्ते जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असून या रस्त्यांवरून बारमाही एस.टी. व अन्य वाहतूक सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांचा पृष्ठभाग अत्यंत खराब झाला आहे मात्र रस्त्यांची लांबी लक्षात घेता जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणाऱ्या अल्प निधीतून रस्त्यांची दुरूस्ती होणे शक्य नसल्याने या रस्त्यांची दर्जोन्नती होवून ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) गुहागर तालुक्यातील पाटपन्हाळे वाकी पिंपळवट या ग्रामीण मार्ग क्र. १२ रस्त्याचा दर्जोन्नती प्रस्ताव अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांच्याकडून मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.
तसेच पोमेंडी गोणवली ग्रामीण मार्ग क्र.९८, तळवली भडकंबा वडद सायाभोईवाडी ग्रामीण मार्ग क्र.२२ व खरवते ओमळी ताम्हणमळा गुळवणे इतर जिल्हा मार्ग क्र. ४९ हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१४/प्र.क्र.६५/नियोजन-२, दिनांक २०.०७.२०१६ अन्वये प्रमुख जिल्हा मार्ग दर्जोन्नतीच्या निकषात बसत नसल्याने सद्यस्थितीत दर्जोन्न्तीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्तीसह नवीन विकास कामांसाठी निधी मिळण्याबाबत**

**(२३) १०६११८ (०९-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्तीसह नवीन विकास कामांसाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेने ५२ कोटी रुपयांच्या निधी मागणीचा प्रस्ताव सहा महिन्यापूर्वी शासनाकडे सादर केला असून शासनाकडून मागणीनुसार निधी उपलब्ध होत नसल्याने ग्रामीण विकासाचे कामकाज पूर्णतः बंद झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार उक्त प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१), (२) व (३) ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्तीसह नवीन विकास कामांसाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेने ५२ कोटी रुपयांच्या निधी मागणीचा प्रस्ताव सहा महिन्यापूर्वी शासनाकडे पाठविल्याचे आढळून आले नाही. तथापि, रस्ते व पूल, दुरुस्ती व

परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला दायित्व व नवीन कामांसाठी रु. ७०८.११ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ओबीसी,एससी,ईबीसी संवर्गातील बेरोजगारांना कर्ज पुरवठा करणा-या आर्थिक विकास महामंडळांना अनुदान देण्याबाबत**

**(२४) १०६४९९ (२८-०३-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ओबीसी,एससी,ईबीसी संवर्गातील बेरोजगारांना कर्ज पुरवठा करणा-या आर्थिक विकास महामंडळांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळाने गत तीन वर्षापासून अनुदान दिले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार केंद्र शासनाकडून अनुदान मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०६-२०१८) :** (१) व (२) या विभागामार्फत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ या दोन महामंडळांचे कामकाज हाताळण्यात येते. सन २०१५-१६ या वर्षापासून राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचेकडून निधी प्राप्त होत नसल्याने निधीच्या उपलब्धते अभावी सन २०१६-१७ नंतर निधी वाटप करणे बंद झाले आहे.

राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली यांनी राज्य शासनाच्या या दोन्ही महामंडळांना यापुर्वी दिलेल्या निधीची परतफेड केली नसल्याने, राष्ट्रीय महामंडळाने या महामंडळांकडे देय असलेल्या रकमेच्या वसुलीबाबत लवाद नेमला असून लवादाच्या आदेशाप्रमाणे तडजोड निधीची परतफेड करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दूधगंगा कालव्यावरील (ता.कागल, जि.कोल्हापूर) पूल धोकादायक झाल्याबाबत**

**(२५) १०७३३० (२८-०३-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल तालुक्यातील (जि.कोल्हापूर) दूधगंगा कालव्यावरील (ता.कागल,जि.कोल्हापूर) पूल धोकादायक झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दूधगंगा कालव्यावरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) नाही.

दूधगंगा डावा कालवा किमी ५३ ते ७६ मध्ये ४ पूल, बिद्री शाखा कालवा किमी १ ते ४१ मध्ये ३८ पूल व निढोरी शाखा कालवा किमी १ ते २५ मध्ये ११ पूल असून सर्व पूलांची बांधकामे सुस्थितीत आहेत.

(२), (३), (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील टेंभू उपसा सिंचन योजनेकरीता केंद्र शासनाकडून १२०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याबाबत**

**(२६) १०७८९० (१२-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील टेंभू उपसा सिंचन योजनेकरीता केंद्रशासनाकडून १२०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी शासनास कशा स्वरुपात देण्यात येणार आहे,

(३) असल्यास,सदरील निधी प्राप्त झाल्यावर टेंभू सिंचन प्रकल्पाचे काम किती कालावधीत पुर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०६-२०१८) :** (१) टेंभू उपसा सिंचन योजनेचा समावेश प्रस्तावित केंद्र शासन अर्थसहाय्यित बळीराजा जलसंजीवनी योजनेत करण्यात आला असून त्याद्वारे प्रकल्पाच्या उर्वरित कामाच्या किंमतीच्या २५% केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त होणे अपेक्षित आहे.

(२) व (३) टेंभू उपसा सिंचन योजनेकरिता उर्वरित किंमतीच्या २५% हिस्सा केंद्रीय अर्थसहाय्याच्या स्वरुपात व ७५% हिस्सा राज्य शासनाच्या निधीच्या स्वरुपात उपलब्ध होणार आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम सर्वार्थाने सन २०२०-२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या "कॉमन सर्व्हीस सेंटर" च्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या अनुदानाची लूट होत असल्याबाबत**

**(२७) १०८१८५ (०९-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या "कॉमन सर्व्हीस सेंटर" च्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या अनुदानाची लूट होत असल्याचा आरोप जिल्हा परिषदेचे पक्षप्रतोद जितेंद्र पाटील यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यस्तरावरील एजन्सीला १२ हजार ३३१ रुपये प्रमाणे अनुदान दिले जाते मात्र केंद्रचालकाच्या हातावर ६ हजार रुपयेच मानधन दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्टेशनरी व इतर खर्च अवास्तव दाखवून लूट सुरु असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास,तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर केंदामार्फत केंद्र शासनाच्या एनआयसी विभागाने तयार केलेल्या ११ आज्ञावलींमध्ये माहिती भरणे, ग्रामपंचायतींचे लेख्यांचे संगणकीकरण करणे, ग्रामस्थांना ग्रामपंचयातीमार्फत मिळणारे १९ प्रकारचे दाखले ऑनलाईन देणे इत्यादी कामे केली जातात.त्याचा मोबदला म्हणून ग्रामपंचायतींमार्फत सीएससी-एसपीव्ही ला केंद्र चालकांचे मानधन, हार्डवेअर देखभाल दुरुस्ती किंवा नवीन पुरविणे, नवीन संगणक प्रणाली तयार करुन त्यांची देखभाल दुरुस्ती करणे, स्टेशनरी पुरविणे, प्रशिक्षण व प्रकल्प अंमजबजावणीसाठी यंत्रणा उभारणे इत्यादींसाठी रुपये १०४५०+कर अशी एकूण रुपये १२,३३१/- इतकी रक्कम कामाच्या प्रमाणात अदा केली जाते. या रकमेमधून सीएससी-एसपीव्ही यांचेकडून केंद्र चालकांना त्यांच्या कामाच्या प्रमाणात रुपये ६०००/- प्रती माह मोबदला देण्यात येतो.

स्टेशनरी व इतर खर्चामध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृष्णा-भीमा स्थिरीकरण व भीमा-मांजरा नदीजोड प्रकल्प आराखडा बनविण्याचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत**

**(२८) १०८६६४ (२८-०३-२०१८). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनेगाव (ता.केज, जि.बुलढाणा) येथे मांजरा नदीवरील मांजरा धरणात उजनी धरणातील मराठवाड्याच्या हक्काचे २१ टी.एम.सी पाण्यापैकी ५ टी.एम.सी पाणी मांजरा धरणात सोडण्यात यावे याबाबत केज विधानसभा मतदार संघाच्या लोकप्रतिनिधी प्रा.श्रीमती संगीता ठोंबरे यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले असता शासनाच्या शिफारशीने केंद्र शासनाने भीमा-मांजरा नदीजोड प्रकल्प तयार करण्याचे ठरविले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणी कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्प पूर्ण करून नंतर भीमा-मांजरा नदीजोड प्रकल्प हाती घेणार असून कृष्णा-भीमा स्थिरीकरण व भीमा-मांजरा नदीजोड प्रकल्प आराखडा बनविण्याचे काम संथ गतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कृष्णा-भीमा स्थिरीकरण व भीमा-मांजरा नदीजोड प्रकल्प आराखडा बनविण्याचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधी श्रीमती संगीता ठोंबरे, विधान सभा सदस्य यांनी दिनांक ७/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये भीमा-मांजरा नदीजोड प्रकल्प हाती घेण्याबाबत केंद्र शासनास शिफारस करावी अशी विनंती मा. मंत्री (जलसंपदा) यांना केली आहे.
(२) व (३) कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पास शासनाने फेब्रुवारी-२००४ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

कृष्णा-भीमा स्थिरीकरणातील लिंक-५ म्हणजेच नीरा-भीमा लिंक द्वारे ७ अब्ज घनफूट पाणी कृष्णा-मराठवाडा उपसा सिंचन प्रकल्पाद्वारे मराठवाडयास उपलब्ध होणार आहे. सदर लिंकचे काम प्रगतीपथावर आहे. भीमा-मांजरा नदी जोड प्रकल्पाचा आराखडा पाणी उपलब्धतेअभावी सद्य:स्थितीत तयार करता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज,अंबाजोगाई व बीड (जि.बीड) तालुक्यात रोजगार हमी योजनेंतर्गत कामे सुरु करण्याबाबत**
**(२९) १०८६६५ (०७-०४-२०१८). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१४ पूर्वी बीड जिल्हयात झालेल्या गैरव्यवहारामुळे केज,अंबाजोगाई व बीड (जि.बीड) तालुक्यातील वैयक्तिक लाभार्थी वगळता इतर सर्व सार्वजनिक कामे बंद करण्यात आली आहेत,हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या निर्णयामुळे ग्रामीण भागातील अनेक कामे बंद झाली असून रोजगार हमी योजनाव्दारे निर्माण होणारे रोजगार पूर्ण बंद असल्याने रोजगार हमी योजनेंतर्गत कामे सुरु

करण्याबाबची मागणी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी व सह संबधित अधिकारी यांच्याकडे केली असता अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रोजगार हमी योजनेंतर्गत सदर तालुक्यातील कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. बीड जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केज, अंबाजोगाई व बीड तालुक्यात वैयक्तिक लाभाची व सार्वजनिक लाभाची कामे सुरु आहेत. या कार्यक्रमांतर्गत मजुरांची कामाची मागणी प्राप्त होताच नियमानुसार त्यांना कामे देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील गावच्या विकासाला गती देण्याकरिता सेवा केंद्रासाठी वेगळया निधीची तरतूद करण्याबाबत**

**(३०) १०९१०४ (२८-०३-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने १४ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना मोठया प्रमाणात निधी देऊन गावच्या विकासाला गती देण्याचा केलेला प्रयत्न अयशस्वी झाला असून कोल्हापूर जिल्हयातील सर्व सरपंचाना एकत्रित करुन संघटितपणे “आपले सरकार सेवा केंद्र” ला विरोध करणार असल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ग्रामपंचायतीना “आपले सरकार सेवा केंद्र” ला वर्षाला १ लाख ४७ हजार ९७२ रुपये द्यावे लागत असल्यामुळे ग्रामपंचायतींना आपल्या हक्काचा निधी गमवावा लागत असून सेवा केंद्राचा भुर्दंड ग्रामपंचायतींना दयावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार गावच्या विकासाला गती देण्याकरिता सेवा केंद्रासाठी वेगळया निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये, त्यांच्या स्वउत्पन्नातून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

स्वउत्पन्नामध्ये ग्रामपंचायतींचे स्वत:चे उत्पन्न, १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधी, आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त निधी व इतर कोणताही मुक्त निधी ज्याचा पूर्णपणे खर्च करण्याचा ग्रामपंचायतींना अधिकार आहे, अशा बाबींचा समावेश होतो.

वरील निधीतून आपले सरकार सेवा केंद्राअंतर्गत प्रशासनाचे संगणकीकरण, ग्रामपंचायतीद्वारे देण्यात येणारे दाखले, इतर विभागाच्या ४०० पेक्षा अधिक सेवा तसेच लोकांसाठी इतर उपयोगी सेवा देण्यात येत असल्याने सेवा केंद्रांचा भुर्दंड ग्रामपंचायतींना बसण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खापा (ता.सावनेर,जि.नागपूर) येथे सहाय्यक अभियंता, लघुसिंचन विभाग, श्रेणी-२ चे शाखा कार्यालयात पदे रिक्त असल्याबाबत**

**(३१) १०९५९९ (१०-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खापा (ता.सावनेर,जि.नागपूर) येथे सहाय्यक अभियंता, लघुसिंचन विभाग, श्रेणी-२ चे शाखा कार्यालयात १६ पैकी १५ पदे रिक्त असून त्यामुळे शेतक-यांना सिंचनविषयक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर अंतर्गत नागपूर पाटबंधारे विभाग (उत्तर), नागपूर अंतर्गत पाटबंधारे उपविभाग सावनेर (सिंचन) करीता खापा येथे शाखा मंजूर असून जलसंपदा विभागाच्या दिनांक ६ फेब्रुवारी, २००३ च्या आकृतीबंधानुसार सदर शाखेकरीता २२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४ पदे कार्यरत असून १८ पदे रिक्त आहेत. या शिवाय सदर शाखा कार्यालयात रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील मजूर पदावरील ३ कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) व (३) शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २ जून, २०१५ अन्वये सरळसेवा भरतीवर निर्बंध घालण्यात आले असून शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २५ मे, २०१७ अन्वये विभागाचा आकृतीबंध सुधारीत झाल्याशिवाय पदभरती करण्यास देखील निर्बंध आहेत.
सद्यस्थितीत जलसंपदा विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे. त्यानुसार विभागाच्या आकृतीबंधास अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

### नाशिक जिल्ह्यातील भाम प्रकल्पातील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(३२) ११०२५४ (१२-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील भाम प्रकल्पातील धरणग्रस्तांना घरकुल योजनेतून घरे बांधून देणे, प्रकल्पग्रस्तांना जमीनीच्या दरातील फरक देणे, पुनर्वसनासाठी दिलेल्या जागेवर वीजपूरवठा करणे इत्यादी मागण्यांचे निवेदन नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना दिनांक ९ जानेवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास भाम धरणग्रस्तांनी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) भाम धरणग्रस्तांनी त्यांच्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिले आहे.
(२) शासन पत्र दि. १५/०४/२०१७ अन्वये प्रकल्प बाधितांना विशेष बाब म्हणून घरकुलाच्या खर्चाची रक्कम रू.१,७४,७६३/- प्रति कुटुंब प्रोत्साहन रक्कम म्हणून मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे आतापर्यंत घरकुलाचे बांधकामानुसार एकूण ३८३ प्रकल्पग्रस्तांना सदर अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे व उर्वरित प्रकल्पग्रस्तांना घरकुलाचे बांधकामानुसार सदर अनुदान वाटप करणेची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच पुनर्वसित गावठाणांमध्ये विद्युत पुरवठ्याची नागरी सुविधा देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाहीत.

---

### पुणे जिल्ह्यातील गुंजवणी प्रकल्पाबाबतची जनसुनवाई अधिकृतरित्या जाहीर रद्द करुनही संबधित अधिका-यांनी जनसुनवाई आयोजित केल्याबाबत

**(३३) ११०४७३ (१३-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर)** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील गुंजवणी प्रकल्पांसंबधितीची जनसुनवाई अधिकृतरित्या जाहीर रद्द करुनही संबधित अधिका-यांनी भोर तालुक्यातील नसरापूर व पुरंदर तालुक्यातील शिवरी येथे

जनसुनवाई आयोजित केली असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या प्रकल्पाच्या अधीक्षक अभियंत्यासह ५ अभियंत्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी गुंजवणी पाणी संघर्ष समितीने राजगड नसरापूर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) होय.

अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे यांनी पोलीस निरीक्षक, राजगड पोलीस स्टेशन, नसरापूर येथे दि.०८/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणाची सद्य:स्थिती कळविलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील १०२८ ग्रामपंचायतीमध्ये काम करणा-या संगणक परिचालकांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत

**(३४) ११०६९२ (२८-०३-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील १०२८ ग्रामपंचायतीमध्ये काम करणा-या संगणक परिचालकांचे गेल्या एक वर्षापासूनचे मानधन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,

(३) असल्यास, त्यानुसार कोल्हापूर जिल्हयातील १०२८ ग्रामपंचायतीत काम करणाऱ्या संगणक परीचालकांना तात्काळ मानधन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) नाही

(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

## रामटेक क्षेत्रातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३५) १११३७४ (१०-०४-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक)** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक विधानसभा क्षेत्रातील इतर जिल्हा मार्ग (ओडीआर), प्रमुख जिल्हा मार्गावर (एमडीआर) मोठया प्रमाणात खड्डे पडून रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे दुचाकी व इतर मोठ्या वाहनांचे अपघात होऊन जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या झालेल्या दुरवस्थेमुळे शेतक-यांना मोठा फेरा घेऊन शेतमालाची वाहतूक करावी लागत असल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून रामटेक क्षेत्रातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) ते (३) रामटेक विधानसभा मतदार संघातील इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांवर पावसाळ्यात काही ठिकाणी खड्डे पडलेले होते. परंतु सदर खड्डे अपघात किंवा शेतक-यांना मोठा फेरा घेवून शेतमालाची बाजारपेठेत वाहतुक करण्यासाठी कारणीभुत ठरतील इतक्या मोठ्या प्रमाणात नव्हते. काही ठिकाणी पडलेले खड्डे भरण्यासाठी जिल्हा परिषदेला विविध लेखाशिर्षांतर्गत प्राप्त निधीतून प्राधान्याने भरण्यात येवून रस्ते वाहतुकीस योग्य करण्यात आले आहेत. तसेच या रस्त्यांवर दुचाकी व मोठ्या वाहनांचे अपघात होवून जिवीत व वित्तहानी झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तसेच प्रमुख जिल्हा मार्गावर काही ठिकाणी खड्डे पडलेले होते, सदर खड्ड्यांची सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुरुस्ती करण्यात आलेली असून रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोले (जि.अहमदनगर) येथील निळवंडे धरणाच्या कालव्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३६) १११९१५ (१३-०४-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) येथील निळवंडे धरणाचे काम पूर्ण झालेले असूनदेखील कालव्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांच्या उर्वरीत कामासाठी दिनांक ११ नोव्हेंबर,२००३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळूनसुध्दा अद्यापपर्यंत सुमारे ४.कि.मी पर्यंतचे काम पूर्ण झालेले असून उर्वरीत काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कालव्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार सदर कालव्यांची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) होय.
(२) उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) ता. अकोले, जि. अहमदनगर या प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालास रु.२३६९.९५ कोटी इतक्या किंमतीस.शासन निर्णय दिनांक २१/०६/२०१७ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार कालव्याची कामे प्रगतीत आहेत.
(३) महामंडळ स्तरावरुन कामाची पाहणी व नियंत्रण करण्यात येत आहे.
(४) उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) ता. अकोले, जि. अहमदनगरच्या चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालास रु.२३६९.९५ कोटी इतक्या किंमतीस.शासन निर्णय दिनांक २१/०६/२०१७ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे

उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) या प्रकल्पाचा विदर्भ मराठवाडयातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयातील व उर्वरित महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त जिल्हयातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठीच्या प्रस्तावित विशेष पॅकेज मध्ये समावेश करण्यात आला आहे.

सन २०१७ - २०१८ या आर्थिक वर्षात प्रकल्पासाठी रू.४६.६० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. उपलब्ध निधीनुसार कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निळवंडे धरणातून थेट शिर्डी व तेथून कोपरगाव पर्यंत पाईप लाईन ने पाणीपुरवठा करण्याच्या कामाच्या सर्वेक्षणाबाबत

**(३७) १११९१७ (३१-०३-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले तालुक्यातील (जि.अहमदनगर) निळवंडे धरणाच्या पाण्याचा थेट शिर्डी पर्यत व शिर्डी पासून ते कोपरगाव पर्यंत पाईप लाईनने पाणीपुरवठा करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने सर्वेक्षणाचे काम हाती घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे राहाता तसेच कोपरगाव तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना या पाण्याचा उपयोग होणार असल्याने सदर सर्वेक्षणाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) व (२) अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यात निळवंडे धरणाच्या पाण्याचा थेट शिर्डी पर्यंत व शिर्डी पासून ते कोपरगाव पर्यंत पाईप लाईनने पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासंदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधीत असून त्यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.

तसेच प्रस्तावित केलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या कामाकरिता निविदा मागविण्याचे काम श्री. साईबाब संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्यामार्फत प्रगतीपथावर असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

(३) उर्ध्व प्रवरा प्रकल्पाच्या (निळवंडे) उर्ध्व प्रवरा डाव्या कालव्या अंतर्गत असलेले तळेगाव शाखा कालवा व कोपरगाव शाखा कालव्यांचे लाभक्षेत्रात कोपरगाव तालुक्यातील ११ गावे (५६६६ हे. सिंचन क्षेत्र) व राहता तालुक्यातील ३७ गावे (१७२३१ हे. सिंचन क्षेत्र) येतात. सदर मुख्य डावा कालवा व त्याचे शाखा कालवे हे प्रवाही पध्दतीचे कालवे असून त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. कालव्यांची कामे वितरण व्यवस्थेसह पूर्ण करुन लाभधारकांना प्रवाही सिंचनाचा लाभ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) ११२०१५ (३१-०३-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील माणगाव तालुक्यातील कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे काम प्रशासकिय मान्यताप्राप्त खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्याने थांबविण्यात आल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०० कोटीची मान्यता असलेला हा प्रकल्प २०० कोटी १२ लाख ३७ हजार रुपये एवढा खर्च होऊनही प्रलंबित राहीला आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर प्रकल्प तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

कुंभे जलविद्युत प्रकल्पास स्वतंत्र प्रशासकीय मान्यता नाही. काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पास दिनांक ०६.०१.२०११ च्या शासन निर्णयान्वये रु. ७४०.४४ कोटी इतक्या रक्कमेची एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, आजतागायत एकत्रित खर्च रु. ११८१.५५ कोटी हा तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त झाला असल्याकारणाने शासन पत्र दिनांक २९.०९.२०१५ अन्वये सदर प्रकल्पावर यापुढे खर्च करण्यात येवू नये, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रकल्पांची कामे संस्थगित ठेवण्यात आली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

काळ कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीमध्ये, कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी रु. २५८.३८ कोटीची (स्थापत्य कामासाठी रु. २०९.०३ कोटी व विद्युत कामासाठी रु. ४९.३५ कोटी) तरतूद आहे. सदर प्रकल्पावर आजतागायत एकूण २४३.२७ कोटी (स्थापत्य घटकांवर रु. २००.३१ + विद्युत व यांत्रिकी घटकांवर रु. ४२.९६ कोटी) एवढा खर्च झालेला आहे. कुंभे जलविद्युत प्रकल्पाच्या विविध घटकांची कामे सुमारे ७५% पर्यंत पूर्ण झाली आहेत. सद्यस्थितीत काळ-कुंभे जलविद्युत प्रकल्पाचा एकत्रित खर्च, प्रकल्पास प्राप्त असलेल्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झाला असल्याने प्रकल्पाची कामे संस्थगित ठेवण्यात आली आहेत.
(३) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. जविप्र-२०१७/प्र.क्र. २०१/जवि, दिनांक २१.०२.२०१८ अन्वये काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्प BOT तत्वावर पूर्ण करण्याकरिता BOT प्रस्ताव, संबंधित निविदा प्रक्रिया व कंत्राटाबाबत कार्यवाही करण्याकरिता कृतिगटाचे गठन करण्यात आले आहे. सदर कृतिगटाकडून पुढील ३ महिन्यात BOT प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरण करण्याबाबत**

**(३९) ११३१६९ (१३-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यातील चासकमान या धरणाच्या डाव्या कालव्याला मोठ्या प्रमाणात गळती असल्याने शिरुर व खेड तालुक्यातील कालव्या नजीकच्या जमीनी मधील पिके उध्वस्त झाली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चासकमान डाव्या कालव्याची प्रत्यक्षात वाहन क्षमता ९३० क्युसेक असताना कालवा ५७५ क्युसेकच्या पुढे जावु शकला नाही व टेला १५० क्युसेकच्या पुढे पाणी जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चासकमान कालव्याची लांबी १४४ किमी.पर्यंत वाढविताना कालव्या अस्तरीकरण करण्याचे प्रयोजन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,सदर कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) चासकमान डाव्या कालव्याची क्षमता ९३० क्युसेक इतकी आहे. डाव्या कालव्याच्या ६७ कि.मी. लांबीपैकी १६ कि.मी. लांबीमधील अस्तरीकरण पूर्ण झाले असून, ५१ कि.मी. लांबीचे अस्तरीकरणाचे काम शिल्लक आहे. सद्य:स्थितीत ५५० क्युसेक्स पेक्षा जास्त विसर्गाने पाणी सोडता येत नाही.

(३) होय.
(४) प्रकल्पाचे बिगरसिंचन आरक्षण, लाभक्षेत्रातील औद्योगिकरण व नागरीकरण तसेच लाभक्षेत्र वगळण्याबाबत मागण्यांचा आढावा घेऊन प्रत्यक्ष सिंचनासाठी शिल्लक पाणी व उर्वरित लाभक्षेत्र याबाबत सुधारित जलनियोजन करण्यात येत आहे. तसेच उर्वरित अत्यावश्यक वितरण व्यवस्थेची कामे बंद पाईपलाईनद्वारे प्रस्तावित करुन, लाभक्षेत्रातील को.प. बंधारे/ल.पा. तलावांचे क्षेत्रही यामध्ये समाविष्ट करण्याबाबत आराखडा तयार करुन याप्रमाणे होणारे बदल विचारात घेऊन सदर प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्याची बाब महामंडळस्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातुर) तालुक्यातील तुंगी ते वानवडा या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४०) ११३३३४ (०५-०४-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातुर) तालुक्यातील तुंगी ते वानवडा या ६ किलोमीटर रस्त्याची दुरवस्था झाली असून गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील ग्रामस्थांनी मागणी करुनही या रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औसा आरोग्य केंद्रात रात्री-अपरात्री रुग्ण घेऊन जाताना, गरोदर महिलांना प्रसुतीसाठी नेताना तसेच आसपासच्या शालेय विद्यार्थ्यांना दररोज या रस्त्याचा वापर करताना गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) रस्त्याची दुरावस्था झाली आहे ,हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रश्नांकित रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून प्रामा-६ - वानवडा- तुंगी (बु.)-संक्राळ ते रामा-२३८ या इतर जिल्हा मार्ग क्र. १०५ चा वानवडा ते तुंगी (बु) हा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची लांबी ३.०० कि.मी. असून पृष्ठभाग डांबरी आहे.
सदर रस्त्यावर तुंगी गावाजवळील २०० मीटर लांबी बुडीत क्षेत्रात बांधलेल्या पूलाच्या दोन्ही बाजूचे ॲप्रोचेसचे काम त्या भागातील शेतक-याने अडवल्याने प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच या रस्त्यावर काही ठिकाणी खड्डे पडले असून खड्डे भरण्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील झर्ये गावाला जोडणाऱ्या**
**रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४१) ११३६२१ (११-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील झर्ये गावाला जोडणारा मात्र प्रत्यक्षात पाचल बाजारपेठ ते कोंडवाडी दरम्यानच्या चार वाडयांना जोडणारा साडेपाच किमी रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांवरुन अवजड वाहनांची सातत्याने ये-जा असल्याने रस्त्याची दुरवस्था झालेली असतांनाही याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामपंचायतीसमोर उपोषण करण्याचा इशारा पाचल-कोंडवाडी ग्रामस्थ मंडळाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार उक्त रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रशासनाचे दुर्लक्ष झालेले नाही. तथापी, पाचल-कोंडवाडी ग्रामस्थ मंडळाने पाचल ग्रामपंचायतीसमोर साखळी उपोषण केले होते.

(३) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून प्रश्नांकित पाचल झर्ये रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. १०६ दर्जाचा असून, त्याची एकूण लांबी १२.००कि.मी. आहे. त्यापैकी सा.क्र. ०/०० ते ३/८०० डांबरी पृष्ठभाग, सा.क्र.३/८०० ते ५/५०० खडीचा पृष्ठभाग व सा.क्र.५/५०० ते १२/०० अस्तीत्वात नसलेली लांबी आहे. सदर रस्त्यावर प्रामुख्याने अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या डाव्या कालव्याकडे जाण्यासाठी अवजड वाहनांची मोठी वहातुक वर्दळ आहे.

(४) या रस्त्याच्या ०/०० ते १/३५० कि.मी. लांबीतील मोठे खड्डे डांबराने भरण्याचे काम ग्रामपंचायत अनुदान सन २०१७-१८ मधून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच १/३५० ते १/८५० कि.मी. मध्ये स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत रु.९.९७ लक्षचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

जिल्हा वार्षिक योजना, सन २०१७-१८ कार्यक्रमामध्ये, कि. मी.३/८०० ते ५/५०० मध्ये मो-या व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रु.१९.२८ लक्षच्या कामास प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वावर वांगणी (ता.जव्हार,जि.पालघर) येथे वाघ आणि लेंदी या दोन नद्यांवर कारगील हिल टेकडी येथे केंद्र सरकारतर्फे सुरु होणाऱ्या दमणगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत**

**(४२) ११३६३५ (३१-०३-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वावर वांगणी (ता.जव्हार, जि.पालघर) येथे वाघ आणि लेंदी या दोन नद्यांवर कारगील हिल टेकडी येथे केंद्र शासनातर्फे दमणगंगा नदीजोड प्रकल्पाचे काम सुरु होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी जव्हारच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०६-२०१८) :** (१) दमणगंगा पिंजाळ आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पांतर्गत दमणगंगा नदीवर ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथे ४२७.०७ द.ल.घ.मी. क्षमतेचे भूगड धरण व वाघ नदीवर ता. मोखाडा, जि.ठाणे (नव्याने जिल्हा पालघर) येथे ४६०.८९६ द.ल.घ.मी. साठवण क्षमतेचे खारगीहील धरण बांधणे प्रस्तावित आहे .

महाराष्ट्र व गुजरात यांच्यामधील दि. ३.५.२०१० रोजीच्या सामंजस्य करारातील तरतुदीनुसार राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने दमणगंगा-पिंजाळ नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून महाराष्ट्र व गुजरात शासनास सादर केला आहे. सदर नदी जोड प्रकल्पाबाबत केंद्र शासनाच्या माध्यमातून सामंजस्य करार झाल्यानंतर केंद्र शासना मार्फत प्रकल्पाचे काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल.
(२) होय
(३) अद्याप प्रकल्पाचे काम हाती घेण्याचा निर्णय झालेला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी केंद्रीय ग्रामविकास विभागाच्या "National Resettlement and Rehabilitation Policy २००७" तसेच भुसंपादन व पुनर्वसन कायदा-२०१३ नुसार कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कु-हा वडोदा, इस्लामपूर उपसा सिंचन योजना (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) व जळगांव जामोद, संग्रामपूर (जि.बुलढाणा) या उपसासिंचन योजना पूर्ण करण्याबाबत**

**(४३) ११५०२५ (१३-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुऱ्हा-वढोदा इस्लामपूर उपसा सिंचन योजना (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव व जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) या प्रकल्पाच्या व्याप्तीसाठी अधिकचा निधी उपलब्ध होण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तापी पाटबंधारे व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ या दोन्ही महामंडळांकडून शासनाकडे निधीची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागण्या मान्य करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) होय, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचेकडून सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी रु.१५००.०० लक्ष पुरवणी मागणी करण्यात आली होती. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील डिसेंबर २०१७ च्या अधिवेशनामध्ये मंजूर झालेल्या पुरक मागण्यामध्ये कु-हा वडोदा, उपसा सिंचन योजनेस शासन पत्र क्र. बीजीएम १०.१८/(३/२०१८)/अर्थ-१, दिनांक ०८.०१.२०१८ अन्वये रु.१५००.००लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले आहे
(४) प्रश्न उद्भवत नाहीत.

---

**वरणगांव-तळवेल परिसर उपसा सिंचन योजनेच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत**

**(४४) ११५०२७ (१२-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरणगांव तळवेल परिसर सिंचन योजना (ता.भुसावळ, जि.जळगांव) या योजनेसंबंधीचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ यानी जलसंपदा विभागाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) व (२)कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ यांचेकडून वरणगाव तळवेल परिसर सिंचन योजना ता.भुसावळ, जि.जळगाव प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागाच्या दि.२०.०३.२०१७ व दि.२६.०९.२०१७ च्या पत्रांन्वये कार्यकारी संचालक ,तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचेकडून मागविण्यात आलेला शेरे पूर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाहीत.

---

**बोदवड परिसर उपसा सिंचन योजनेच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत**

**(४५) ११५०२९ (१२-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड परिसर सिंचन योजना (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) या योजनेसंबंधीचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ यानी जलसंपदा विभागाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) व (२) होय.

बोदवड परिसर उपसा सिंचन योजना या प्रकल्पास केंद्र शासनाकडून विशेष सहाय्य (Grant in Aid) अंतर्गत केंद्रीय जलसंसाधन मंत्रालयाच्या पत्र क्र. २७/२/२०१२-PRदि. २४.०७.२०१२ अन्वये एकरकमी रु.५०० कोटी अर्थ सहाय देण्याचा निर्णय झाला आहे. त्यापैकी रु.६६.६६ कोटी इतका निधी केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त झाला आहे. सदर निधी वितरित करण्याबाबत तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडून त्यांच्या दि.२२.१२.२०१७ च्या पत्रान्वये शासनास विनंती करण्यात आली आहे. सदर प्रकल्पासाठी वर्ष २०१७-१८ मध्ये एकूण रु.२६.०६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला असून वर्ष २०१८-१९ करिता रु.२० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कांगवई-वेरळ-उन्हवरे, देव्हारे-वडवली (आतले) -शेवरे या ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(४६) ११५४०३ (०७-०४-२०१८). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कांगवई-वेरळ-उन्हवरे, देव्हारे-वडवली(आतले) -शेवरे या ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांवर वारंवार अपघात होत असून ग्रामस्थ , विद्यार्थी तसेच कोकणात पर्यटनासाठी येणा-या पर्यटकांची गैरसोय होत असून उक्त रस्त्यांचे कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देवून उक्त रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी विभागाकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने रस्त्यांचे डांबरीकरण व मजबूतीकरण करण्यासाठी निधी देवून तात्काळ रस्त्यांचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) अंशत खरे आहे.
(२) प्रश्नांकित रस्त्यावर अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. परंतु सदर रस्ता दुरुस्त करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे.
(३) अ) पालवणी वेरळ उन्हवरे तोंडली विरसई कांगवई या इतर जिल्हा मार्ग क्र.७ ची ०/०० ते ११/०० कि.मी. लांबी मंडणगड तालुक्यामध्ये असून या रस्त्याच्या १०.९० कि.मी. लांबीचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०१८-१९ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.
ब) प्र.रा.मा. क्र. १५ ते देव्हारे वडवली (आतले) शेवरे चिंचघर या इतर जिल्हा मार्ग क्र. १० ची एकूण लांबी १२.८०० कि.मी. आहे. सदर लांबीपैकी ७.६०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची व ५.२०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभागाची आहे.
डांबरी पृष्ठभागापैकी १.४०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.
सदर रस्त्याच्या २/०० ते ३/६०० कि.मी.लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे रु. ८.०० लक्षचे काम सन २०१७-१८ मध्ये रस्ते व पुल परिरक्षण कार्यक्रम गट ब अंतर्गत मंजूर आहे. उर्वरीत खराब लांबीमधील कामे उपलब्ध निधी व निकष यांच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सिना-कोळगाव प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळण्याबाबत

**(४७) ११५४४८ (१२-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सिना-कोळगाव प्रकल्पांतर्गत सन १९९७ पासून कालव्याची व शाखा वितरीकांची कामे झालेली असून शेतक-यांच्या भूसंपादनाची रक्कम दिली गेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे हिवरे व गोंडरे (ता.करमाळा) येथील ३० हेक्टर जमीन संपादनाच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी रु.५.७० कोटी रक्कमेस मान्यता दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूसंपादनाची रक्कम मान्य करण्यात आली असतांनाही ती शेतकऱ्यांना न देण्याची कारणे काय आहेत व किती कालावधीत उक्त प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम देण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सीना कोळेगाव प्रकल्पांतर्गत पंपगृह, उर्ध्वगामी नलिका, मुख्य कालवा सा.क्र. ० ते १२००मी., आवाटी शाखा कालवा वाखळी क्र. ० ते ३००० मी., सा.क्र. ८.७६ ते १०.३५ कि.मी. वितरिका-१ या घटकांसाठी भूसंपादनाचे अंतिम झाले असून संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रकमेचे वाटप या पूर्वीच करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी एकूण रु.५.७० कोटी निधीची मागणी कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामहामंडळ स्तरावर विचाराधीन असून निधी उपलब्ध होताच तात्काळ संबंधित शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

## मोखाडा, जव्हार तालुक्यांतून वाहणा-या तीन नद्यांचे पाणी जव्हार व मोखाडा गावाला देण्याबाबत

**(४८) ११५४६७ (१२-०४-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नदी जोड प्रकल्पाच्या नावाखाली मोखाडा, जव्हार तालुक्यांतून वाहणा-या तीन नद्यांचे पाणी गुजरातला देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी महाराष्ट्राच्या सीमेवर वावर वांगणी भागात मोठे धरण बांधण्यात येणार असल्याने हजारो हेक्टर शेती संपादित केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे अनेक गावेही विस्थापित होणार असतांनाही या दोन मोखाडा,जव्हार या तालुक्यांना या प्रकल्पातून केवळ १४ टक्केच पाणी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१८) :** (१) महाराष्ट्र व गुजरात यांच्यामधील दि. ३.५.२०१० रोजी झालेल्या सामंजस्य करारातील तरतुदीनुसार राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने दमणगंगा-पिंजाळ नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे.

सदर प्रकल्प अहवालानुसार दमणगंगा खो-यात दमणगंगा नदीवर ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक येथे ४२७.०७ द.ल.घ.मी. साठवण क्षमतेचे भूगड धरण व वाघ नदीवर ता. मोखाडा, जिल्हा पालघर येथे ४६०.८९६ द.ल.घ.मी. साठवण क्षमतेचे खारगिहिल धरण बांधणे प्रस्तावित आहेत.

भूगड ते खारगिहिल धरण व खारगिहिल ते पिंजाळ धरण बोगद्याद्वारे जोडण्यात येणार असून पाणी पिंजाळ प्रकल्पात वळवून मुंबई शहराला पिण्याचे पाणी देणे प्रस्तावित

आहे. उपरोक्त धरणांपैकी भुगड धरणाच्या पाणलोट क्षेत्रापैकी काही क्षेत्र गुजरात राज्यामध्ये असून त्या भागात पडणारे पाणी गुजरातला देणे प्रस्तावित आहे.

(२) राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने मार्च २०१४ मध्ये तयार केलेल्या प्रकल्प अहवालानुसार दमणगंगा पिंजाळ नदीजोड प्रकल्पांतर्गत वावर वांगणी भागात वाघ नदीवर खारगीहील धरण प्रस्तावित असुन या धरणाचे बुडीत क्षेत्रासाठी १५५८ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. (६१२ हेक्टर खाजगी, ६७६ हेक्टर वनजमीन, २७० हेक्टर इतर)

(३) राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने तयार केलेल्या अहवालानुसार दमणगंगा पिंजाळ नदीजोड प्रकल्पांतर्गत दमणगंगा नदीवर ४२६.३९ द.ल.घ.मी. क्षमतेचे भुगड धरण व वाघ नदीवर ४६०.७९ क्षमतेचे खारगिहील धरण बांधण्यात येणार असून १०० % विश्वासार्हतेचे अनुक्रमे २१० द.ल.घ.मी व ३६९ द.ल.घ.मी असे एकूण ५७९ द.ल.घ.मी पाणी मुंबईस पिण्यासाठी पुरवण्याचे प्रस्तावित आहे.

दमणगंगा खो-यातील सिंचनासह स्थानिक वापरासाठी (सिंचन + बिगरसिंचन + पर्यावरण) ३२३.९० द.ल.घ.मी. पाणी वापर नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंबडोस व्हाळवाडी ( ता.मालवण जि.सिंधूदूर्ग) ते खळनाथ मंदिर जोड रस्ता करुन पूल बांधण्याबाबत**

**(४९) ११५७९५ (०७-०४-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबडोस व्हाळवाडी ते खळनाथ मंदिर जोड रस्ता करुन पूल बांधून मिळावा अशा आशयाच्या मागणीचे एक निवेदन तेथील ग्रामस्थाचे वतीने श्री.अशोक पांडूरंग दळवी यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचे कडे दिनांक १५ एप्रिल,२०१७ रोजी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद याचे कडे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीनुसार रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण तसेच त्यावरील पूलाचे काम विनाविलंब होती घेऊन तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नांकित रस्त्याचे व पुलाचे काम करण्यासाठी मोठ्या स्वरुपात निधीची आवश्यकता आहे. पुल बांधण्याचा कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविला जात असल्याने सदर पुलाचे काम प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

तसेच सदर रस्त्याचे काम जिल्हा परिषदेला रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम/जिल्हा वार्षिक योजना इ.मधून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील अजनसरा बॅरेज उपसा सिंचन प्रकल्प आजनसरा गावाजवळ प्रस्तावित करण्याबाबत**

**(५०) ११५९२१ (१२-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील आजनसरा बॅरेजला मंजुरी मिळाली असूनही अद्याप काम सुरू करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बॅरेजला प्रशासकीय मंजुरी केव्हा मिळाली आहे व निविदेचा कालावधी काय आहे,

(३) असल्यास, या बॅरेजचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१८) :** (१) होय.

(२) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील आजनसरा बॅरेज प्रकल्पास दि.२३ एप्रिल २००० रोजी (वर्ष १९९६-९७ च्या दरसुचीनुसार) रू १५८.२१ कोटी मूळ प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. ती व्यपगत झाल्याने दि.२८ नोव्हेंबर २००६ अन्वये (वर्ष २००५-०६ चे दरसुचीनुसार) रू.२०८.४२ कोटीस नव्याने प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे. या प्रकल्पास केंद्रीय जलआयोगाची मान्यता, पर्यावरण मंत्रालयाची मान्यता तसेच वन प्रस्तावास अंतीम मान्यता प्राप्त नसल्याने प्रकल्पाच्या कामांची निविदा काढण्यात आली नाही.

(३) १) पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्ताव मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान,नाशिक यांना सादर करण्यात आला असून उपस्थित केलेल्या मुद्यांची त्रुटी पुर्तता सुरू आहे. २) पर्यावरणाच्या मान्यतेकरिताच्या प्रस्तावास प्रकल्पाचे टी.ओ.आर. ला केंद्र शासनाचे पर्यावरण मंत्रालयाची मान्यता दि. ११.०७.२०१७ ला प्राप्त झाली आहे. पर्यावरण अभ्यास करुन अंतिम पर्यावरण मान्यता घेण्यात येईल. ३) प्रकल्पाकरीता आवश्यक असलेली ३१.५६ हेक्टर वनजमिनी प्रस्तावास दि.२५.०८.२००८ रोजी वनविभागातर्फे तत्वत: मान्यता मिळाली. अंतिम मान्यता प्रस्ताव दि. ३.०६.२०१६ रोजी सादर करण्यात आला. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा., नागपूर यांचे दि. २०.०९.२०१६ चे पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुषंगाने पर्यायी वनीकरणाकरिता रू.९१.७० लक्ष वाढीव निधीचा भरणा

दि.२९.१०.२०१६ रोजी वन विभागास करण्यात आला असून इतर मुद्याचे अनुपालन अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा., नागपूर यांना सादर करण्यात आले आहे. अंतिम मान्यता मिळाल्यावर प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.